मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 5 जून 2025 | पान- 1


# आळंदीजवळ कत्तलखाना कधीच होणार नाही

## महानगरपालिकेच्या हद्दीत जे आरक्षण आहे, ते आम्ही रद्द करू; उद्योगमंत्री उदय सामंत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नुकताच प्रसिद्ध केलेल्या प्रारुप सुधारीत विकास आराखड्यात मोशी डुडुळगाव सीमेवर श्री क्षेत्र आळंदी पासून हाकेच्या अंतरावर चार एकर जागेवर कत्तलखाना प्रस्तावित करण्यात आल्याने समस्त हिंदूत्ववादी संघटना व वारकरी संप्रदायामध्ये तीव्र संतपाची लाट उसळली आहे, ही भावना उदय सामंत यांना समजल्यावर त्यांनी सांगितलं होतं की याठिकाणी कत्तलखाना होणार आहे. यावेळी महंतांच्या साक्षीने सांगितलं की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत जे आरक्षण आहे, ते आम्ही रद्द करू. कत्तलखाना इथे कधीच होणार नाही असा शब्द उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आळंदीत दिला.

श्रीक्षेत्र आळंदी येथे ह.भ.प.प्रमोद महाराज जगताप यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती कृतज्ञता सोहळा आणि गौरवग्रंथ प्रकाशन सोहळा उद्योग मंत्री उदय सामंत हस्ते संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी चैतन्य महाराज देगलूरकर, शांतीब्रह्म मारोतीबाबा कुरेकर, संतवीर बंडातात्या कराडकर, खासदार राजाभाऊ वाजे, सत्कारमूर्ती महंत प्रमोद महाराज जगताप, मा.आ.गोरीराम पवार, अक्षय महाराज भोसले, पुरुषोत्तम महाराज पाटील, श्रीभाऊ महाराज परांडे, भागवत महाराज साळुंखे, उमेश महाराज बागडे, राहुल चव्हाण, अजित वडगावकर यांसह महानुभाव, महंत, वारकरी बंधू-भगिनी उपस्थित होते.



मराठी भाषेचा मंत्री झाल्यापासून सहा महिन्यांत मी तीन वेळा श्रीक्षेत्र आळंदीला आलो आहे. ज्ञानेश्वरी ही सर्वसामान्यांच्या हातात पोहोचली पाहिजे, अशी लोकांची मागणी होती. त्यानुसार, पुढच्या आठ तासांत ज्ञानेश्वरीची छपाई करण्याचा निर्णय घेतल्याचं मी नमूद केलं. इतर क्षेत्रांप्रमाणेच वारकरी पंथातही पद्म पुरस्कार दिला पाहिजे, असं मत व्यक्त करत, लवकरच गुरुवर्य शांतीब्रह्म मारोतीबाबा महाराज कुरेकर यांना पद्म पुरस्कार मिळण्याची शिफारस करणार असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.






# सर्वाधिक हरकती समाविष्ट गावांतील

## गेल्या पंधरा दिवसांत एक हजार 600 पेक्षा अधिक हरकती व सूचना प्राप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासाठीचा प्रारूप विकास आराखडा (डीपी) महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मंजूर केला आहे. त्यावर हरकती व सूचना मागवल्या आहेत. त्यानुसार गेल्या पंधरा दिवसांत एक हजार ६०० पेक्षा अधिक हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यात सर्वाधिक संख्या ही १९९७ मध्ये महापालिकेत समाविष्ट झालेल्या १८ गावांतून आहे. हरकती-सूचना नोंदण्यासाठी आणखी दीड महिन्यांचा कालावधी असून त्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.



> वाल्हेकरवाडी, चिंचवडेनगर, बिजलीनगर, थेरगाव, पिंपळे गुरव, रहाटणी, कासारवाडी परिसरातून 'एचसीएमटीआर' जातो. त्यामुळे अनेक जण बाधित होत आहेत. त्यामुळे प्रस्तावित ३१ किलोमीटर लांबीचा व सर्वाधिक नागरिकांना बाधिक करणाऱ्या 'एचसीएमटीआर'मध्ये फेरबदल करावा.
>
> **- विजयकुमार पाटील, मुख्य समन्वयक, घर बचाव संघर्ष समिती.**

शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी दर २० वर्षांनी 'डीपी' आखला जातो. सध्याचा 'डीपी' तयार करण्याचे काम २०१८ पासून सुरू होते. त्यासाठी २०४१ मधील संभाव्य लोकसंख्येचा विचार केलेला आहे. 'डीपी' हा शहराच्या सर्वांगीण विकासाचा एक आराखडा असतो. त्यामध्ये शहरातील नागरिकांच्या अपेक्षा अभिप्रेत असतात. आलेल्या सर्व हरकती व सूचनांवर सुनावणी होऊन योग्य त्यांची दखल घेऊन त्या समाविष्ट केल्या जातील, त्यानंतर अंतिम 'डीपी' सरकारकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. सरकारही त्यांवर हरकती व सूचना मागविणार, त्यांवर सुनावणी होणार, त्यांतील योग्य 'त्यां'चा समावेश करून 'डीपी' मंजूर होऊन त्याची अंमलबजावणी होईल. या सर्व प्रक्रियेसाठी आणखी किमान वर्षभराचा कालावधी लागू शकतो.